Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 3.1560(UIF)
Volume-5 | Issue-1 | Feb-2015
Available online at www.isrj.org

वामन जाधव यांच्या कादंबरीतील समाजदर्शन

प्रा.ओहळ अभिमन्यू गेना

छत्रपती शिवाजी कला व वाणिज्य रात्र महाविद्यालय, सोलापूर.

प्रस्ताविक :-

भारतीय समाजाचे अदिम काळापासून शिक्षणाला महत्व दिले आहे. शिक्षण क्षेत्र हे एक पवित्र क्षेत्र मानले गेल्यामुळे जगात कुठेही न आढळणारी गुरु - शिष्य ही परंपरा फक्त भारतात आजही तेवढयाच सन्मानाने जपली आहे. समाजात आढळणा-या अनिष्ठ रुढी, परंपराना साधु - संतापासून ते समाज सुधारकापर्यत सर्वाना लोकशिक्षणाच्या माध्यमांद्वारे हद्दपार केले. एक खंबीर मानवतावादी, सदृढ, सुसंसकृत समाज निर्माण व्हावा यासाठी त्यांनी आपले सारे आयुष्य चंदनागत झिजवले. राजर्षी महाराज, महात्मा फुले, म.वि.रा. शिंदे , डॉ.बाबासाहेब आंबेउकर, संत गाडगेबाबा,कर्मवीर भाऊराव पाटील इत्यादीनी शिक्षणाचे महत्व ओळखून शिक्षण संस्थाची स्थापना केली आणि त्यामुळेच समाजात अनेक विद्वान, तंत्रज्ञान, संशोधन, शेती इत्यादी अनेक क्षेत्रात भारतीय समाजाने अतुलनीय अशी प्रगती केलेली पहायला मिळते.

काळाच्या ओधात अनेक क्षेत्रात बदल झाले, त्याला शिक्षण क्षेत्रही अपवाद राहिले नाही. जागतिकीकरणाच्या बाजारात शिक्षणाचाही बाजार बनला गेला. शिक्षण संस्था राजकारणाचा अड्डा बनल्या. भ्रष्टाचार करण्याचे साधन बनल्या. नैतिकता. सुसंस्कृतला या मुल्यांचे शिक्षण देणा-या या शिक्षण संसथामधून अनैतिक कृष्णकृत्ये राजरोसपणे सुरु असल्याचे आपणाला आज पहायला मिळतात. या सर्व घडामोडी साहित्याद्वारे समोर आणण्यांचे महत्व कार्य अनेक लेखकांनी केले आहे. यामध्ये भालचंद्र नेमाडे (कोसला) ह.मो. मराठे (निष्पर्ण) वृक्षावर भरदुपारी) वामन जाधव (वॉन्टेड,सार्थक) इत्यादी अनेक साहित्यीकांची नांवे सांगता येतील. परंतु या सर्व लेखकामध्ये डॉ.वामन जाधव यांच्या वॉन्टेड आणि सार्थक या कादंब-याचे कार्य बहुमोल स्वरुपाचे आहे.

*** डॉ.वामन जाधव यांचे साहित्य** :- डॉ.वामन जाधव हे ग्रामीण साहित्य क्षेत्रातील एक महत्वाचे साहित्यीक म्हणून गणलेजातात. त्यांचा जन्म पंढरपूर परिसरातील कासेगांव यागावात एक दलित - शेतकरी कुटूंबात झ्ाला. ते मराठी विषयातून महाविद्यालयात अध्यापन करतानाच त्यांनी विपुल प्रमाणात साहित्य संपदा निर्माण केली आहे. ते एक आघाडीचे ग्रामीण कथाकार आहेत. त्यांचे अंधार, आक्रोश, सार्थक, आणि नक्षत्र हे कथासंग्रहवाचकांना भुरळ पाडतात. त्यांच्या सार्थक आणि वॉन्टेड या दोन कांदब-या आहेत. ग्रामीण साहित्य आणि शेतकरी जीवन, ग्रामीण साहित्य प्रवाह आणि परिस्थिती हे दोन समीक्षा ग्रंथ आहे. त्याच बरोबर माती आणि संस्कृती हा संपादन ग्रंथ प्रसिध्द आहे. ग्रामजीवनाचे यर्था चित्रण हे विद्रोही स्वरुपात मांडतात.

*** डॉ.वामन जाधव यांच्या कादंबरीतील समाज जीवनाचे दर्शन** :- १९८० नंतरची मराठी ग्रामीण कादंबरी अनक अर्थाने महत्वाची आहे. ग्रामीण जीवनातील अनेक प्रश्न कादंबरी या वाड.मय प्रकाराने अधोरेखीत केले आहेत. ग्रामीण स्त्रीला केंद्र स्थानी ठेवून मराठी कादंबरी अपवादानेच लिहिली गेली आहे. ग्रामीण साहित्यातील ही उणीव वामन जाधव यांच्या सार्थक याकादंबरीने भरुन काढली आहे.

सोजा ही या गादंबरीची नायिका आहे. ती जातीने दलित मांग या जातीची आहे. तिला केंद्रस्थानी ठेवूवनच लेखकने कादंबरी साकार केली आहे. खंबीर, आक्रमक, धाडशी, अशा स्वभावाची सोजा वाचकांच्या दीर्घकाळ लक्षात राहते. प्रस्थापित राजकारणाला ती धक्का देते. त्यांच्या विरुध्द ती बंडखोरी करुन उभी राहते असे या कादंबरीचे कथानक ग्रामीण राकारणाला जीवघेणा संषर्घ या कादंबरीत आला आहे. ग्रामीण राजकारणातील अनेक कंबोरे या कादंबरीत पहायला मिळतात. ग्रामीणदलित जीवनाची भाषा या कादंबरीत आली आहे.

वॉन्टेड ही वामन जाधव यांची दुसरी वास्तवादी स्वरुपाची कादंबरी सुशिक्षित बेरोजगारांच्या हतबलतेचा शिक्षण सम्राट कसा फायदा घेतात,त्यांची कशी पिळवणूक करतात. त्यांना वेळोवेळी कसेनागवलेजातेयांचे विदारक वास्तव दर्शन या कादंबरीत प्रतिनिधीक रुपाने लेखकाने मांडले आहे.

पैशाच्या बळावर गबरगंड झालेल्या संस्थापकाकडून कर्मचा-यांचे मानसिक, आर्थिक, बौध्दिक इत्यादी प्रकारचे खच्चीकरणकरुन त्याचें शोषण कसे केले जाते. विद्वान म्हणवून घेणा-यांच्या कथनी व करणातील फरक, शिक्षणाच्या पवित्र क्षेत्रात होणारा भ्रष्टाचार, विद्वानांचे नैतिक अध:पतन इत्यादी अनेक वास्तव बाबींचा उहापोह लेखकाने या कादंबरीत केलेला आहे.

या कादंबरीचा नामक शिवाजी भोसले हा गरीब परिस्थितीतून उच्च शिक्षण घेतलेला तरुण आहे. अर्थशास्त्र विषयातून एम.ए.ची पदवी मिळवून तो महात्मा फुले कला व वाणिज्य महाविद्यालयात, करुणानगर येथे तासिका तत्वावर प्राध्यापक म्हणुन रुजु होतो. परंतु ज्ञानदानाच्या क्षेत्रात त्यांची पिळवणूक पदोपदी होते. अध्यापनापेक्षा इतर गोश्टीतच शिक्षकांना गोवले जाते. त्यांची वेळोवेळी गेची करुन त्यांना वेठीला धरले जाते. त्यातच सी.एच.बी. वर काम करणा-याची ससेहोलपट कशी होते हे लेखकाने निर्भिडपणे मांडले आहे.

शिक्षण क्षेत्रात धनदांडग्या संस्थापकांची एक नवीन जमात तयार झालेली आहे. शिक्षक मग तो प्राथमिक माध्यमिक शाळांचा असो किंवा महाविद्यालयांचा असो, त्याला विशिष्ट पात्रता धारण करावी लागते. परंतु संस्थापक बनण्यासाठी मात्र अंगठे बहादूर असणारे कसे ? हे विदारक सत्य समोर आणणारा प्रश्न लेखकाच्या मनात येतो. राजकारण आणि पैशाचा माज यांच्या बळावर प्राचार्यापासन ते प्राध्यापक - कर्मचा-यापर्यत ते नमवू शकतातव त्यांना हवा तसा त्यांना वापर करु शकात त्याचा प्रत्यय शिवाला सुरुवातीलाच आला. शिकवण्यापेक्षा घरच्या शेतीत लक्ष देणारा प्राचार्य शिवाला घरच्या म्हशीला रेडा दाखवण्यासाठी पाठवून देतो. साईनाथ चव्हाण महाविद्यालयाचा हेडक्लार्क पण तो ही सचिवाच्या घरी म्हशी धुण्याचेही काम करताना दिसतात. शोशण हाया कादंबरीचा मुळ पाया आहे. इथेप्रत्येकाला कोत्याना कोणत्या स्वरुपात शोषण होते. तरीही प्रत्येकजण आपणाला इतरांचे शोषण कसे करता येईल याची संधी शोधताना दिसतो. सचिव कर्मचारी भरती, प्राध्यापकाची भरती, इतर अनुदान यामध्ये पैसे लाटण्यासाठी धडपडतो. प्राचार्य मिळेल तेथून पैसे लाटतो. सचिव व प्राचार्य मिळून महाविद्यालयातील कर्मचा-याना आपआपल्या शेतात राबवून घेतात. साईनाथ चव्हाण व गायचोर हे क्लार्क संस्था आणि सावकार यांची दलाली करुन पैसे मिळवतात. अगदी शिपाई सुध्दा चहा, झेराक्स इत्यादी माध्यमातून तर संस्था परीक्षा फी ,डोनेशन इत्यादी माध्यमातून पैसे कमवताना दिसतात. प्राध्यापक सुध्दा एकमोकंची ऊणी- दुणी काढतात. त्यामुळेच विभाग प्रमुखाला शिवाचे प्राचार्याशी सलगीने वागणे खटकते. त्यामुळे शिवाला त्याचेही बोलणे खावे लागते. याच शोषणाची झळ तासिका तत्वावर हंगामी काम करणा-या शिवाला मोठया प्रमाणा बसतो. त्याला जनावरे, घरातील दागदागिने विकून, सावकाराकडून पतसंस्थेकडून कर्ज काएून सचिवाला दीड लाख रुपये जमवून द्यावे लागतात. हे कर्ज काढतानाचे शिवाचे अनुभवही फार विचित्र आहेत. संस्थेचे व सावकाराचे दलात चव्हाण व गायाचोरत्याला मदत करण्यासाठी तत्पर असतात कारण त्यासाठी त्यांचावैयक्तिक फायदा पुरेपुर घेण्याची संधी मिळालेली असते. स्वत:चा फायद घेऊनही ते आपण त्यांच्यावर उपकार करतोआहोत असा आव आणतात.

अध्यापनाच्या कार्याबरोबरच महाविद्यालयामध्ये इतर अनेक उपक्रम राबवले जातात. त्यातील महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन हे साजरे करण्यासाठी शिक्षकांचा कर्मचा-याचा पगार कपात करुन त्याचे आयोजन केले जाते. प्रमुख पाहुण्यांची बडदास्त ठेवण्यासाठी त्यालामांसापासून मद्यापर्यत सर्व सोयी पुरवाव्या लागतात. पंरतु हाच पाहुणा नैतिकता आणि संस्कृतायावर टाळाचा खेचणारे भाषण् देतो. कानी व करणी यात विसंगती असणारी अशी माणसे समाजाला मागे घेऊन जातात याचे हे नमुनेदार उदाहरण आहे.

महाविद्यालयात साजरा केला जाणारा शिक्षकदिन ही असाच ज्याच्या स्मृतीप्रित्यर्थ हा दिन साजरा केला जातो तो श्रीधर बेवडे हा शिक्षक मुळचा सावकार, गावात पहिल्यांदापानेच संगीत बारी आणली, कोणत्याही स्त्रीच्या अंथरुणात शिरणारा, वेळप्रसंगी स्त्रीयांचा चपलेने मार खाणारा, वेश्यागमण करणारा परंतु चारचौघात सुसंसकृतपणाचा आव आणून टाळया खेचणारे भाषण करणारा ,नैतिकतेचे डोस वाजणारा असा हाबेवडे अपघातात मरण पावला आणि त्याचीच स्मृती म्हणून हा दिवस शिक्षक दिवस म्हणून साजरा केलाजाते.त्यांच्या स्तुतीपर भाषणे केली जातात. आदर्श शिक्षक पुरस्कार दिले जातात. हा प्रसंग म्हणजे समाजाची नैतिकता ढासळत चालल्याचेच उदाहण मानायला हवे.

नैतिक अध:पतनाचे आणखी उदाहरण पहायचं तर सहकारी स्त्री प्राध्यापकाची सर्वच प्राध्यापक चवीने टिंगल टवाळी करतात. पांडू हा शिपाई परंतु सचिवाचा पाहुणा म्हणून तोमुजोर वर्तन करतो. महाविद्यालयातील वृषाली मॅडमचा पटवण्यासाठी तो धडपड असतो. संस्थेचा सचिवही शिरवाडकर मॅडमवर डोळा ठेवून असतो. तिच्या सौंदर्याची,मादक अंगकाठीची चर्चा प्राचार्याशी करताना दिसतो.

यासर्वामध्ये बळी गेला आहे तो शिवाजी भोसले यांचा ,लोकांच्या मते तो भरपूर पगार असणारा शिक्षक, परंतु प्रत्यक्षात मात्र तो तुटपुंज्या पगारावरील हंगामी प्राध्यापक आहे. घरातील जनावरे - दागदागिने विकून व र्क काढून संस्थेला पैसे दिल्याने तोकर्जबाजारी बनला आहे. यामुळेच तो शेडमध्ये राहतो. स्वस्त रॉकेल मिळते म्हणून कित्येककिलोमिटर सायकवर जातो. स्वतःच्या बायकोची कोणतीही हौस तो पूरवू शकत नाही. आईवडिलांचे स्वप्न पूर्ण करुन त्यांना सुखत ठेवू शकत नाही. त्याला पदोपदी लाचरीचे जीवन जगावे लागते. सासू ज्ञ सासराहीत्याला टाकून बोलातत. गर्भवती पत्नीला योग्य उपचार न दिल्याने तिचा गर्भपात होतो, तिच्यावर उपचार करण्यासाठीही शिवाकडे पैसे नसल्याुळे सासू शिवाला नको नको ते बोलते, आपल्या पहिल्या मुलालामातीत गाडण्याची शिवावर वेळ येते. शिक्षणामुळे जर एवढी लाचारी येते तर हे शिक्षण काय कामाचे असा प्रश्न शिवाला पडतो.

शेवटी लेखकाने नायक शिवाकरवी मांडलेले निवेदन एका प्रखर वास्तवाकडे नेऊन ाते हे निवेदन या कादंबरीचा आत्मा वाटतो आणि समाजहिताची जाण असल्याने हे सांगताना लेखनाला एक वेगळीच धार आलेली दिसते. चाललेला काळा बाजार यावरुन शिक्षण संस्थांना ज्ञानमंदिर बनवण्याचा लेखकाचाप्रयत्न दिसतो. अगदी मोठमोठया नावाजलेल्या संस्थाही आज खालच्या पातळीवरुन व्यवहार करुन दर्जाकडे न पाहता व्यवहाराकडे पाहताना दिसतात. हे सर्व थांबवण्याचा लेखकाचा प्रयत्न दिसतो. ही लढाई एकटया दुकटयाची नसुन येथे लढण्यासाठीच प्रामाणिक असे योध्दे पाहिजेच हेच वॉटेड याशीर्षकातून सुचवायचे आहे. यासाठी गरज आहे, निष्ठवान, प्रामाणिक,धैर्यवान अशा सुशिक्षित लोकांची, हेच लोकपाहिजेत अशीलेखकाचीहाक आहे. याकादंबरीत लेखकाला समाजात जेजोदिसे ते ते मांडले आहे. कादंबरीची निवेदनाची भाषा प्रमाणभाषा असली तरी पात्रे मात्र अस्सल बोली भाषेची वापर करतात. बोली भाषेतील शब्द, म्हणी, शिव्या जाशाच्या तशा यात आल्यामुळे लेखकानेही कोणताहीआडपडदा न ठेवता ते मांडल्यामुळे कांदबरीतील घटना - प्रसंगीाची परिणामकारकता वाढलेली दिसते. ही केवळ प्रचारकी थाटाची कादंबरी नाही तर स्वतः शिक्षण महर्षी म्हणवून घेणा-याशा दलालांनी मंदिरातल्या सरस्वतीला बाजारातली वेश्या बनवले आहे. या सगळया सडलेल्या व्यवस्थे विरुध्द रान उठवावे, मोर्चेकाढावेत, जनजागृती करावी, त्याच मृत्युआला तरी चालेल, परंतु हे सर्व थांबायला हवे. . अशी आतं हक्क देणारी ही कादंबरी होय.

समारोप :-

वामन जाधव यांच कादंबरी ग्रामीण स्वरुपाचे वास्तव मांडताना दिसते. ग्रामीण राजकरणातल्या जीव घेण्या संघर्षात सर्वसामान्याचा बळी जातो हे यात स्पष्टपणे मांडले अहे. या कादंब-यातील स्त्री खंबीर, आक्रमक, बाणेदार, स्वरुपाची आहे. असहाय्य,हतबल सुशिक्षित बेराजगारांचे जीव घेणे वास्तव यातून दिसते. शिक्षण संस्था मधला आतला काळाबाजार त्यांनी अत्यंत धीटपणे मांडला आहे हेच याकादंबरीचे महत्वाचे शक्तीस्थळ मानायलाहवे.

संदर्भ :-

१) वॉन्टेड :- डॉ. वामन जाधव
२) सार्थक :- डॉ.वामन जाधव
३) कोसला :- भालचंद्र नेमाडे
४) निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी :- ह.मो. मराठे
५) ग्रामीण साहित्य प्रवाह आणि परिस्थिती : डॉ.वामन जाधव